Maya CARE Foundation
The next best thing to family

# माया केअर फाऊंडेशन

News Letter

**✻ वार्तापत्र ✻**

वर्ष : 4 थे• अंक : 3 रा
एप्रिल – जून 2025
केवळ खाजगी वितरणासाठी विनामूल्य

# संपादकीय ...

२०२५ ची पहिली तिमाही संपलेली आहे आणि या तिमाहीत भारतात बऱ्याच आशादायक घडामोडी झाल्या. पहिली तिमाही संपुष्टात येत असताना आपण विकासाकडे वाटचाल करीत आहोत. सरकारने पहिल्या दोन कार्यकाळात महत्त्वपूर्ण काम केले आहे. जगातील सर्वात वेगाने वाढणारी आपली अर्थव्यवस्था आहे, त्यामुळे देशाच्या सामर्थ्यावरील विश्वास वाढीला लागत आहे. त्यामुळे सर्वांच्या विकासासह देश पुढे वाटचाल करीत आहे. भारत सरकारचे युनियन बजेट  वित्तमंत्री निर्मला सीतारामन यांनी जाहीर केले आणि याचा परिणाम भारताच्या अर्थव्यवस्थेवर खूप अनुकूल होईल अशी आशा आहे. कृत्रिम बुद्धिमत्ता तंत्रज्ञान हे अजूनही त्याच्या बाल्यावस्थेतच आहे, त्यामुळे सुदैवाने भारताला या क्षेत्राच्या बाबतीतला आपला पाया मजबूत करण्यासाठी आणि देशव्यापी संस्थात्मक प्रतिसाद संकलित करण्यासाठी पुरेसा कालावधीही आहे. हे तंत्रज्ञान  आरोग्य सेवा, संशोधन, फौजदारी न्याय क्षेत्र, शिक्षण, व्यवसाय आणि वित्तीय सेवांसह विविध क्षेत्रांशी संबंधित अत्यंत महत्त्वाच्या निर्णय प्रक्रियेमध्ये मानवी कामगिरीला मागे टाकेल अशी अपेक्षा आहे. या अर्थसंकल्पात रोजगारांमध्ये वाढ करण्यासाठी, स्वयंरोजगाराला चालना देण्यासाठी आणि कामगार कल्याणाला प्रोत्साहन देण्यासाठी सरकारने अनेक उपाययोजना राबवल्या आहेत.

सर्वात महत्वाचे म्हणजे १२ लाख रुपया पर्यंतच्या उत्पन्नावर संपूर्ण सूट दिली आहे नोकरदार व पेन्शनर यांचेसाठी १२ लाख ७५ हजार रुपये पर्यंतच्या उत्पन्नावर कोणताही कर आकारला जाणार नाही. जेष्ठ नागरिकांनी बँकेत ठेवलेल्या ठेवीवरील एक लाख रुपये पर्यंतच्या व्याजातून आयकर कपात केली जाणार नाही. येत्या तीन वर्षात सर्व जिल्हा रुग्णालयात कॅन्सर साठी डे केअर सेंटर स्थापन केली जाणार आहेत. तसेच उत्तम आरोग्य सुविधा उपलब्ध करून देणार असल्याचे, अर्थमंत्री यांनी जाहीर केले. आर्थिक वर्ष २०२६ मध्ये प्रत्यक्ष सकल राष्ट्रीय उत्पन्न वाढीचा दर ६.३ ते ६.८ टक्क्याच्या दरम्यान राहील असा अंदाज त्यांनी व्यक्त केला.

'आंतरराष्ट्रीय आनंद दिना'निमित्त, संयुक्त राष्ट्रांनी जगातील आनंदी देशांची यादी जाहीर केली आहे. २०२५ च्या या यादीत १४७ देशांचा समावेश करण्यात आला आहे, ज्यामध्ये अनेक युद्धग्रस्त देशांचाही समावेश आहे. या अहवालात समाविष्ट असलेल्या १४७ देशांना तेथील लोकांच्या जीवनमानाच्या गुणवत्तेच्या आधारे क्रमांक देण्यात आले आहेत. अहवाल तयार करण्यासाठी वेगवेगळे प्रश्न विचारात घेण्यात आले आहेत.

कोणत्या देशातील लोक त्यांच्या आयुष्यात किती आनंदी आहेत हे ठरवताना, कोणत्या देशातील लोक त्यांच्या आयुष्यात किती आनंदी आहेत, त्यांच्याकडे किती पैसे आहेत, त्यांचे आरोग्य कसे आहे आणि ते किती स्वतंत्र आहेत, अशा विविध प्रश्नांचा विचार करून, आढावा घेऊन  आनंदी देश या यादीत प्रत्येकाला क्रमांक देण्यात आले आहेत. ऑक्सफर्ड विद्यापीठाच्या वेलबीइंग रिसर्च सेंटरने गॅलप, यूएन सस्टेनेबल डेव्हलपमेंट सोल्युशन्स नेटवर्क आणि स्वतंत्र संपादकीय मंडळाच्या भागीदारीत जागतिक आनंद अहवाल २० मार्च रोजी प्रकाशित केला. हा अहवाल तयार करताना देशातील उत्पन्न, सामाजिक आधार, निरोगी आयुष्य, स्वातंत्र्य, उदारता आणि भ्रष्टाचाराचे प्रमाण या महत्त्वाच्या निकषांचा विचार केला जातो. त्यामध्ये या देशांची निवड करताना प्रामुख्याने त्या देशात असलेल्या सामाजिक सुरक्षेपासून ते देशाच्या राष्ट्रीय उत्पादनापर्यन्त आणि नागरिकांच्या सागरी आयुर्मानापासून भ्रष्टाचारा पर्यंत अनेक बाबी लक्षात घेतल्या जातात. एकूण  माणसाला आनंदी राहण्यासाठी नक्की काय गरजेचे आहे याचा शोध या निमित्ताने घेतला जातो या अहवालामध्ये सर्वात आनंदी आणि सर्वात कमी आनंदी देशांमधील तफावत अधोरेखित करण्यात आली आहे.

या यादीत फिनलंड या देशाने सलग आठव्या वर्षी आपले पहिल्या नंबरचे स्थान कायम ठेवले आहे. समाधानाची गोस्ट अशी कि भारताने गेल्या वर्षापेक्षा प्रगती केली आहे. गेल्या वर्षी भारत १२६ व्या क्रमांकावर होता यावर्षी तो ११८ या क्रमांकावर आहे सर्वात शेवटच्या क्रमांकावर अफगाणिस्थान हा देश आहे. या यादीत पाकिस्तान  १०९ व्या स्थानावर आहे. पाकिस्तानने याबाबतीत भारताला मागे टाकलं आहे . जगातील अनेक युद्धग्रस्त देशांची क्रमवारीही भारतापेक्षा चांगली दाखवण्यात आली आहे. यामध्ये युक्रेन, पॅलेस्टाईन, इराक, इराण सारखे देश देखील समाविष्ट आहेत.

अ‍ॅडव्हेंचर्स बियॉन्ड बॅरियर्स फाउंडेशन, सोशल व्हेंचर पार्टनर्स इंडियाच्या पुणे चॅप्टरच्या सहकार्याने, दिव्यांगांचा समावेश असलेली मॅरेथॉन स्पर्धा रन इनसिंक ने ८ फेब्रुवारी २०२५ रोजी सावित्रीबाई फुले विद्यापीठ कॅम्पसमध्ये आयोजित केली होती. या कार्यक्रमात सुमारे ५,००० सहभागी एकत्र आले, त्यात सुमारे, १,००० दिव्यांग व्यक्ती होत्या. त्या कार्यक्रमात मायाकेअरमध्ये बॅक ऑफिस मध्ये काम करीत असेलेल्या १२ दिव्यांग व्यक्तींनी भाग घेतला होता आणि त्यांच्या मदतीला सुमारे २० मायाकेअरचे पुण्यातील स्वयंसेवक होते.

अ‍ॅमीकेन या संस्थेने एक स्मार्ट वॉकिंग स्टिक तयार केलेली आहे. सदरची वॉकिंग स्टिक घेऊन फिरायला गेलेल्या ज्येष्ठ नागरिकांना मदतीची गरज असल्यास त्या वॉकिंग स्टिक च्या सहाय्याने घरातील व्यक्तीशी संपर्क साधता येतो. या कंपनीने तयार केलेल्या वॉकिंग स्टिक मायाकेअर सेवा देत असलेल्या ३८ ज्येष्ठ नागरिकांना देण्यात आल्या. यासाठी माया केअरला अर्थसहाय्य Putzmeister India Pvt. Ltd. या संस्थेने केले होते.

*************************************************************************************

# लाभार्थ्यांच्या प्रतिक्रिया

प्रियांका यादव ठरलेल्या वेळेवर (ठीक ११–३० वा.) माझ्या घरी आली. तिने अतिशय काळजीपूर्वक मला हाताला धरून रस्ता क्रॉस करायला मदत केली. ती हसतमुख आणि बोलकी आहे. माझा माया केअरचा हा पहिलाच अनुभव खूप समाधानकारक वाटला. माया केअरचा हा उपक्रम खूपच स्तुत्य आहे. तुम्हा सर्वांना धन्यवाद आणि खूप साऱ्या शुभेच्छा !

भारती मोरे मुंबई – ९८६७४१६०१८

***

मी कुसुम गुरव दिवशी बु। ता.पाटण जि. सातारा गावची रहिवासी असून माझ्या वयामुळे मला घराबाहेरील पडता येत नाही . मार्केटमध्ये जाता येत नाही अशा वेळेत माया केअरचे वॉलेंटियर फोन केल्यानंतर येतात आणि मला खूप छान सर्व्हिस देतात. माया केअरने आमच्यासाठी खूप चांगली सर्व्हिस सुरु केली. आज मी एकटीच राहते. अशा वेळेस आधार माया केअरचा मिळतो. देव आपल्या सर्व टीमला आशीर्वाद देईल.

***

कुसूम शंकर गुरव.सातारा .मो. ८४४६१४९८५७

माझे नाव राजकुमार आहे माया केअर ची सर्विस एकदम बेस्ट आहे विनोद सर हे मला महिन्याला औषधे गोळ्या आणून देतात खूप छान कार्य आहे आणि हे असंच चालू ठेवावे ही माझी विनंती आहे.

***

राजकुमार हिबरे.सोलापूर.९४०४०१४४२१

मायेने काळजी घेणारी माणसे, नावातच आपल्या कार्याची उद्देश स्पष्ट आहे. आजच्या झपाटलेल्या जगात, स्वतःच्या मुलांच्या डोक्यावरून प्रेमाने हात फिरवण्याची सवड, त्या–स्पर्शातून त्याला आश्वासक करण्याची गरज लोकांना वाटत नाही अशा स्थितीत वृद्धांची विचारपूस करणे, प्रेमाचा आधार देणे. मायेचा शब्द बोलणे हे सर्वथा कठीण
या पाश्वभूमीवर भ्रमर्मावर आपले कार्य निश्चित स्पृहणीयः आपल्या संस्थेची माहिती कळल्याने व श्रीम वैशंपायन यांच्या आगमनाने आज ९२ व्या वर्षी ही मी आपुलकीचा आनंद उपभोगू शकले. आपल्या कार्याला शुभेच्छा.

***

प्रभा सारंग.९१६८३२६९८१

मी संदिप गोविंद खेडेकर
हॅलो मॅडम तुमची माया केअर सेवा आम्हाला खूप आवडली आहे, दिपाली जाधव मॅडम यांनी आम्हाला खूप मदत केली आहे. माझ्या आईला दवाखान्यात, मंदिरात, बाजारात, पुस्तके वाचून दाखवणे, बस स्थानकावर सोडणे, आईला वेळ देण्यासाठी मॅडमनी खूप मदत केली आहे माझी आई एकटी असते मी तिचा मुगला आहे माझी बायको वारली आहे.
दिपाली जाधव मॅडमनी आईसोबत खूप गोड प्रेमाने बोलणे आहे मॅडमचा स्वभाव खूप छान आहे तर आईला खूप आवडते आणि त्या आल्यावर खूप खुश होऊन जाते ती खूप कंटाळाची आणि स्वत: ला एकटी समजायची पण मॅडमचे हे दोन तास एकदम फ्रेश करून जातो व तिला एकट असल्याचे थोडेही वाटत नाही कोणीतरी आहे आपल्या सोबतीला. तुमच्या माया केअर सेवा मुळे दिपाली जाधव मॅडमनी आम्हाला खूप मदत आणि आईवर खूप माया केली आहे तुमचे व दिपाली जाधव मॅडमचे व माया केअर फाउंडेशनचे खूप मनापासून धन्यवाद...

संदिप गोविंद खेडेकर.८९२८५७९१७१

# माया केअर वृत्त

१) दिनांक ३० डिसेंबर २०२४ रोजी रुबी हॉस्पिटल, हिंजवडी, पुणे येथे माया केअर सेवा बद्दल माहिती मकरंद निमोणकर यांनी दिली.

२) दिनांक १४ जानेवारी २०२५ रोजी पुणे महापालिकेच्या दिव्यांग प्रदर्शनात ज्येष्ठ नागरिक व दिव्यांग व्यक्तींना मदत आणि सहाय्य याबाबत माहीती मकरंद निमोणकर यांनी दिली.

३) दिनांक १९ जानेवारी २०२५ रोजी पुण्यातील ज्ञानप्रबोधिनी येथे अंध आधार गटासाठी जेष्ठ नागरिकांना दिल्या जाणाऱ्या माया केअरच्या सेवांची माहिती देण्यात आली.

४) दिनांक २१ जानेवारी २०२५ रोजी निवारा येथे माया केअरच्या स्वयंसेवकांना निवारा संस्थेच्या अटी, नियम आणि कार्यपद्धतींबाबत माहिती राजीव नातू यांनी दिली यावेळी विद्याधर जोशी, अनिल नातू व मकरंद निमोणकर उपस्थित होते.

५) दिनांक २२ जानेवारी २०२५ रोजी नूमवि ६८ च्या बॅचच्या विद्यार्थ्यांना माया केअरची माहिती मकरंद निमोणकर यांनी दिली.

६) दिनांक २५ जानेवारी २०२५ रोजी नाशिक येथे केतकर मंडळीच्या संमेलनात माया केअरची माहिती नाशिक येथिल माया केअर स्वयंसेवकांनी दिली.

७) सनसिटी ज्येष्ठ नागरीक संघाच्या वतीने जागतीक महिला दिनाच्या निमित्ताने स्वयंसेवक स्वाती पाफाळे ह्यांचा सत्कार करण्यात आला.

८) दिनांक १ फेब्रुवारी २०२५ रोजी कर्वेनगर, पुणे येथील मधुसंचय गणपती मंदिरात माया केअरच्या स्वयंसेवकांची बैठक आयोजित करण्यात आली. या बैठकीत विविध उपक्रमांची रूपरेषा, अनुभवांचे कथन करण्यात आले.

९) दिनांक ८ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे विद्यापीठात आयोजित मॅरेथॉनमध्ये माया केअरच्या स्वयंसेवकांनी आणि बिंदू टीमच्या सदस्यांनी उत्साहाने सहभाग घेऊन आनंद लुटला.

१०) दिनांक १९ फेब्रुवारी २०२५ रोजी परभणी येथील स्नेह वृद्धाश्रमाच्या उद्‌घाटन कार्यक्रमास मकरंद निमोणकर प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. या प्रसंगी त्यांनी वृद्धाश्रमाच्या कार्याचा गौरव करत ज्येष्ठ नागरिकांसाठी माया केअरच्या सेवांबाबत माहिती दिली.

११) दिनांक २३ फेब्रुवारी २०२५ रोजी पुणे विद्यापीठात आयोजित मॅरेथॉनमध्ये माया केअरतर्फे श्रीमती वीणा जोग यांनी उत्साहाने भाग घेतला.

१२) दिनांक ११ मार्च २०२५ रोजी मराठवाडा इंजिनिअरिंग कॉलेज येथे माया केअरच्या ३८ ज्येष्ठ लाभार्थींना ॲमीकेन स्मार्ट वॉकिंग स्टिक वाटप करण्यात आले.

१३) बँक ऑफ महाराष्ट्र निवृत्त कर्मचारी संघटना यांच्या तर्फे माया केअरचे उत्कृष्ट कामाबद्दल गौरविण्यात आले. याप्रसंगी विद्याधर जोशी, अनिल नातू व मकरंद निमोणकर उपस्थित होते.

१४) माया केअर स्वयंयेवकांनी कार्यस्थळी वर्तणूक कौशल्यांवर आधारित पुणे वाहतूक पोलिसांसाठी सुरु असलेल्या प्रकल्पात सहभाग घेतला.

# आमची बिंदू टीम : अपंगावर मात करून बाजी.

१. ज्योतीचा जन्म १७ मार्च १९७७ रोजी मुंबईमध्ये झाला. जन्माच्या दीड वर्षानंतर ज्योतीला पोलिओचे दोन अटॅक आले त्यामध्ये तिचे स्पाइनल कॉर्ड वरचे नियंत्रण गेले ज्यामुळे ती व्हीलचेअर वर आली. तिने दहावीपर्यंतचे शिक्षण नॉर्मल मुलांच्या शाळेमध्ये केले व त्यानंतर तिने अर्थशास्त्रामध्ये आपले पोस्ट ग्रॅज्युएशन पूर्ण केले.
परंतु त्यावेळेस तिला घरातून काम अशी नोकरी हवी होती. परंतु कोणताही मार्ग मिळत नव्हता. एके दिवशी तिची बाल मैत्रीण अन्नपूर्णा कडून माया केअर संस्थेबद्दल माहिती मिळाली. त्यानंतर माया केअर च्या संस्थापिका मंजिरी गोखले जोशी यांच्याशी फोनवरून संपर्क झाला व त्यांनी इंटरव्यू घेऊन माया केअर मध्ये काम द्यायला सुरुवात केली. काही कालावधीनंतर ज्योतीला कॉम्प्युटरवर काम कसे करायचे ? हे समजण्यासाठी ज्योती कडे एक मुलगी कॉम्प्युटर शिकवण्यासाठी येत असे. हळूहळू तिने प्रकल्प समन्वयकाची जबाबदारी घेतली व काम करू लागली. मेल पाहणे, लोकांशी फोनवर बोलणे, कॅलेंडर बुक करणे अशी छोटी मोठी कामे ती करू लागली.
त्यानंतर संस्थापकांनी सांगितल्या प्रमाणे २०२० मध्ये बिंदू प्रकल्प सुरू केला. त्यावेळेस त्यांनी ज्योतीला सांगितले होते की तुझ्यासारखे अनेक दिव्यांग लोक एकत्र करून आपण त्यांच्याकडून काम करून घेऊ शकतो.



ज्योती मोरे

त्याप्रमाणे बिंदू प्रकल्पाला सुरुवात झाली. त्यामध्ये ज्योतीने इतर बऱ्याच दिव्यांगांची मुलाखत घेऊन त्यांना कामे देण्यास सुरुवात केली. त्यानंतर टीम सोबत कोरोना काळामध्ये मास्क वितरण, नवीन शहरांमध्ये माया केअर ची सेवा सुरू करणे, रोटरी क्लब यासारख्या प्रकल्पावर काम करू लागली. हळूहळू संस्थेला CSR कडून देणगी प्राप्त होऊ लागली. त्यामुळे ज्योतीच्या मार्गदर्शनाखाली ५६ शहरांमध्ये माया केअर चे कार्य सुरू झाले. व दिव्यांगांची एक मोठी टीम ज्योतीच्या मार्गदर्शनाखाली काम करू लागली. त्यानंतर हळूहळू प्रत्येक शहर समन्वयक नेमून ज्योती स्वतः राष्ट्रीय समन्वयक झाली. संस्थेचा विस्तार आता भारतातील ७२ शहरांपर्यंत पोहोचला आहे. ज्योती सध्या HR म्हणून काम पाहते. माया केअर मुळे ज्योतीला मोठा आधार मिळाल्याचे ती सांगते. याबद्दल ती संस्थापकांचे नेहमी आभार मानते.

---

२. अर्चना चा जन्म ७ डिसेंबर १९६९ ला झाला. ती एक वर्षाची असताना आजी– आजोबांसोबत गावाला गेली होती. तिकडून परत येत असताना तिला प्रवासामध्ये ताप आला. काही वेळानंतर ताप जास्त आल्यामुळे ती बेशुद्ध झाली. त्यानंतर घरचे अर्चनाला डॉक्टरांकडे घेऊन गेले. बराच वेळ होऊनही अर्चना शुद्धीवर आली नाही. त्यांनी अर्चनाची जगण्याची आशा सोडून दिली होती. त्यावेळेस अर्चना चे आई– वडील व आजी–आजोबा रात्रभर तिच्याजवळ बसून होते. दुसऱ्या दिवशी सकाळी अर्चनाला शुद्ध आली तेव्हा तिला समजले की तिचे शरीर पूर्ण निकामी झाले होते.तिला कोणत्याही हालचाली करता येत नव्हत्या. त्यानंतर घरच्यांनी परत अनेक प्रकारचे वैद्यकीय उपचार केले त्यामध्ये ॲलोपॅथी, आयुर्वेदिक, नॅचरोपॅथी असे अनेक उपचार अर्चना वर करण्यात आले. त्याचबरोबर तिचे दोन वेळा ऑपरेशन ही करण्यात आले तरीही तिला स्वतःची हालचाल करता येत नव्हती.
अर्चनाचे वडील हायस्कूल शिक्षक असल्यामुळे तिने तिचे शिक्षण घरूनच पूर्ण केले. कारण तिला शाळेमध्ये घेऊन जाण्यासाठी कोणी नसायचे. हायस्कूलच्या शिक्षणानंतर तिने मुक्त विद्यापीठ नाशिक मधून पदवी पूर्ण केली. तसेच बालक मंदिर चा कोर्स पूर्ण केला व चिकित्सा डिप्लोमा व नॅचरोपॅथी आणि क्युप्रेशर चा डिप्लोमा पूर्ण केला.



अर्चना जोशी

ती २००३ साली कुटुंबासहित पुणे येथे स्थायीक झाली. त्यावेळेस तिने ४ वर्षे कुरियर आणि ट्रॅव्हल्स मध्ये नोकरी केली. त्यानंतर अकोला येथे असताना दिव्यांग लोकांना मिळणारा लोकल पीसीओ चालवला. व पहिली ते पाचवी पर्यंतच्या मुलांना घरी शिकवणी घेत असे. अर्चनाला हस्तकलेचा छंद होता. ती मोती रांगोळी, मॅट बनवते व ऑर्डर घेते. २०२१ मध्ये तिला रचना बडगुजर या मैत्रिणीकडून माया केअर बद्दल माहिती मिळाली व ती माया केअर मध्ये रुजू झाली. सध्या अर्चना डेटा एन्ट्री व कॉलिंग चे काम करत असते तसेच माया केअर च्या वतीने विविध कार्यशाळेमध्ये भाग घेत असते. माया केअर मुळे तिला मोठा मित्रपरिवार व काहीतरी नवीन शिकण्याची इच्छा पूर्ण होत असल्याची ती सांगते.

---

## श्रध्दांजली

**गेल्या तिमाहीत पुणे येथील खालील लाभार्थी ज्येष्ठ नागरिकांचे निधन झाले. त्यांना भावपूर्ण श्रद्धांजली.**

| | | | |
|---|---|---|---|
| कुमार भाटवडेकर | मधुकर खाडिलकर | जयाताई ओक | माधव कृष्णाजी पारधी |
| १५ फेब्रुवारी २०२५ | १८ फेब्रवारी २०२५ | १९ डिसेंबर २०२४ | ११ जानेवारी २०२५ |

| | |
|---|---|
| डॉ. एस पंचरत्नम( देणगीदार) | अमिता दलाल |
| २ जानेवारी २०२५ | २१ मार्च २०२५ |

# स्वयंसेवकांचा अनुभव

पूर्वीपासूनच कोणाला मदतीची गरज असेल तर मी नेहमीच मदतीला तत्पर असे.मला मदत करणे आवडायचेही. आणि यातूनच मी काही संस्थांबरोबर कामही केले. त्यातून खूप चांगले अनुभव ही मिळाले. आणि त्याबरोबरच वैयक्तिक मदत करणेही चालू होते. माझ्या मैत्रिणी , आजूबाजूच्या कष्टकरी महिला , आर्थिक दुर्बल घटकातील विद्यार्थी, वेगवेगळ्या कामासाठी माझ्याकडे येत असत.त्यांना मार्गदर्शन, कधी त्यांच्या कामासाठी मला स्वतःला धावपळही करावी लागत असे .आणि बहुतेकांची कामे वेळेवर आणि योग्य मार्गदर्शनाने होत असत. मी कुठल्याही कामाचे कधीच एक रुपयाही कोणाकडून घेतला नाही. उलट मदतीसाठी येणारा वर्ग आर्थिक दुर्बल घटकातील असल्यामुळे मीच माझ्या स्वखर्चाने ही कामे करत असे.

एके दिवशी, वर्षभरापूर्वी माझ्या एका मैत्रिणीने 'माया केअर फाउंडेशन ' या संस्थेची पोस्ट पाठवली. मी त्यावेळी पुण्यात रहात होते..आणि यापूर्वी करोनामुळे तीन वर्ष मी घराच्या बाहेर पडणे टाळत होते. माझा बाहेर जाण्याचा पूर्णपणे आत्मविश्वास गेलेला होता. ५ मिनिटे अंतरावर जायचे तरी मला सोबत लागत असे.घरातली किंवा आजूबाजूची माणसे त्यांच्या कामासाठी निघून गेलेली असत. 'माया केअर' ची मदत घ्यावी कां. ? संस्थेबद्दल विश्वास होता. माझ्या Dentist च्या Clinic मध्येही मी माया केअरचे माहिती पत्रक पाहिले होते. आपल्या मदतीला येणारी व्यक्ति विश्वासू असेल का.. ? अशी शंका मनात यायची.

माझ्या सामाजिक क्षेत्रात काम करणाऱ्या मैत्रीणीला विचारले कि,माया केअरची मदत घेऊ का.. ? संस्था चांगली आहे.पण मदतनीस विश्वासू असतील का.. ? मैत्रिणीने सांगितले तू जरूर मदत घे. आणि मी 'माया केअर ' या संस्थेला फोन केला. मला समन्वयक (Co-ordinator) संतोष भाऊ तुळजापुरे यांचा फोन नंबर मिळाला. संतोष भाऊंशी मदतनीस संदर्भात बोलणे झाल्यावर मला मदतनीस संदर्भात खात्री आणि विश्वास वाटला.

त्यानंतर मी डोंबिवलीत राहाण्यास आले होते. वर्षभरापूर्वी माझ्या कामासंदर्भात मी संतोषभाऊनां मदतनीस मिळु शकेल कां विचारले. व त्यांनी मला ठाणे एरीयातील समन्वयक (Co-ordinator ) चा नंबर दिला. मला समन्वयकने मदतनीसाचा नंबर पाठवला. अशा प्रकारे मला मदतनीस अनुजा कदमने खूप चांगल्या प्रकारे मदत केली. संतोष भाऊंनी मला 'माया केअर फाउंडेशन'काम कशा पद्धतीने चालते या संदर्भात कांही व्हिडिओ क्लिप्स, माहितीपूर्ण पोस्ट पाठवल्या.मी यापूर्वी जेष्ठ नागरिकांसाठी बरेच काम करत असल्यामुळे संतोषभाऊंनी मला 'माया केअर फाउंडेशन' संदर्भात काम करू शकाल कां ? विचारणा केली. आणि मी 'माया केअर फाउंडेशन' च्या विश्वासार्ह प्रोसिजरने 'माया केअर फाउंडेशन' ला जानेवारी २०२५ पासून join झाले. यापूर्वीही माझे जेष्ठ नागरिकांसदर्भात बॅन्क, दवाखान्यात सोबत जाणे, आजी-आजोबां बरोबर मदतीसाठी जाणे हे चालूच असायचे.आणि मी ते काम आवडीने, प्रेमाने आपुलकीने आणि वेळ काढून करत असे. माया केयरला jion झाल्यावर, मी माझ्या परिचित-अपरिचित ज्येष्ठ नागरिकांना 'माया केअर फाउंडेशन'ची माहिती सांगू लागले. या विश्वासामुळे ज्येष्ठ नागरिक माझे ओळखीचे किंवा आजी आजोबांना एक विश्वास निर्माण झाला कि,आपल्याला मदत हवी असेल तर 'माया केअर फाउंडेशन'आपल्याला मदत करेल. आणि मी आणि माया केअरचे विश्वासू , प्रेमळ मदतनीस 'माया केअर ' आणि ज्येष्ठ नागरिक यांच्यामधील दुवा झाले. हक्काने आजी आजोबा आम्हांला यांना मदतीसंदर्भात फोन करणे, निरोप पाठवणे, येता जाता भेटले कि, त्यांच्या कामाची आधी कल्पना द्यायला लागले. 'माया केअर'च्या मदती संदर्भात त्यांच्या चेहऱ्यावरचा आनंद आणि समाधान बघितले कि, 'माया केअर 'ची सेवा खूप आनंद आणि समाधान देऊन जाते.! आजी आजोबांचे आशिर्वाद तर मिळतातच परंतु त्यांच्या चेहर्यावरचे हास्य,डोळ्यातली माया खूप समाधान देते. जे आजी आजोबा घरात असतात, वृद्धाश्रमातले आजी आजोबा 'माया केअर' मदतनीसांची आतुरतेने वाट पहात असतात. 'माया केअर'ला join झाल्यावर जबाबदारीची जाणीव झाली. आणि माया केअर ची identity मिळाली. मदत कशा पद्धतीने करणे आवश्यक आहे , आपुलकी,प्रेम, माया, सहकार्य हा दृष्टिकोन मिळाला. आणि सर्वात महत्वाचं आजी आजोबांचं हास्य, समाधान आणि विश्वास 'माया केअर 'चे मदतनीस, समन्वयक आणि अनेक online सहकारी यांना मिळाला. आजी आजोबा आणि मदतनीस, माया केअर समन्वयक आणि माया केअर फाउंडेशन' यांच्यामध्ये आपुलकीचे, स्नेहाचे, मायेचे बंध निर्माण झाले .!

'माया केअर फाउंडेशन' चे काम अधिकाधिक शहरांत, गावांत लोकांपर्यंत पोहचण्यासाठी 'माया केअर फाउंडेशन'चे सहकारी, सदस्य प्रयत्न करत आहेत. प्रोत्साहित करत आहेत माया केअरचे काम on-line आणि मदती संदर्भात offline चालते. Teamwork योग्य पध्दतीने विश्वासाने चालत आहे. Hospital मध्ये Help Desk पध्दतीने होत आहे. त्याचाही पेशंट्सनां खूप उपयोग होतो आहे. माया केअरचे विश्वासार्ह काम पाहून अनेक मदतनीस सदस्य नसलेले, पण सदस्य होऊन सहकार्य करण्यासंदर्भात, वेळ देण्यासंदर्भात इच्छुक आहेत. अनेक डॉक्टर मेडिकल कॅम्प संदर्भात, फ्री सेवा देण्यात आनंदाने सहकार्य करत आहेत. हीच 'माया केअर फाउंडेशन' ची यशस्विता आहे.

धन्यवाद.!

***************

माधवी काळोखे (डोंबिवली)

## ॲमिकेन स्मार्ट काठी (AmiCane Smart Waking Stick )

तुमच्या स्वतंत्रपणे राहणाऱ्या वृद्ध प्रियजनांच्या सुरक्षिततेबद्दल तुम्हाला काळजी वाटते का? त्यांना त्यांचे स्वातंत्र्य प्रिय आहे, पण तुम्ही त्यांच्या आरोग्याबद्दल सतत चिंतित असता.

अमेरिकन जेरियाट्रिक्स सोसायटीच्या जर्नलमध्ये असे नोंदवले आहे की ७० वर्षांपेक्षा जास्त वयाच्या २४% पेक्षा जास्त लोकांना चालण्याच्या साधनांची आवश्यकता असते. जर ते चालण्याचे साधन त्यांना आणि तुम्हाला दोघांनाही मनःशांती देऊ शकले तर?

ॲमिकेन सादर करत आहोत, स्मार्ट वॉकिंग स्टिक जी ज्येष्ठांना त्यांच्या प्रियजनांना जोडलेले ठेवून स्वतंत्रपणे जगण्यास सक्षम करते.

कल्पना करा: तुमचे शेजारी, वर्तक काका, त्यांच्या १० किमीच्या चालण्यासाठी दररोज ॲमिकेन वापरतात. त्यांच्या पत्नीला हे जाणून मनःशांती मिळते की त्यांना मदतीची आवश्यकता असल्यास, ती फक्त एका कॉलवर उपलब्ध आहे.

ॲमिकेन ही भारतातील एकमेव स्मार्ट काठी आहे, जी खालील वैशिष्ट्ये देते:

स्वयंचलित पडणे शोधणे: ते पडल्यास तुम्हाला त्वरित सूचना देते.


एसओएस बटण: एका स्पर्शाने त्वरित मदत पुरवते.

जिओफेन्सिंग: ते नियुक्त सुरक्षित क्षेत्र सोडल्यास तुम्हाला सूचित करते.

शक्तिशाली टॉर्च: कमी प्रकाशातही त्यांचा मार्ग प्रकाशित करते.

ज्येष्ठ नागरिकांची गतिशीलता आणि सुरक्षा वाढवणाऱ्या या नाविन्यपूर्ण उपायासाठी आम्ही भारतीय पेटंटसाठी अर्ज केला आहे. AmiCane हे नोंदणीकृत ट्रेडमार्क देखील आहे.

ज्येष्ठ नागरिकांसाठी काम करणारी संस्था म्हणून, माया केअर फाउंडेशन त्यांच्या आजोबा आणि आजींशी २४/७ जोडलेले राहण्यासाठी ॲमिकेनचा प्रभावी वापर करू शकते. ॲमिकेन स्मार्ट स्टिक ज्यांना पाहिजे असेल त्यांनी माया केअरशी संपर्क साधावा.



माया केअर मधील बिंदू समूहाने ऑनलाईन पद्धतीने
जागतिक महिला दिन साजरा केला.



पर्णकुटी बेघर
निवारा केंद्र मुंबई येथील
ज्येष्ठांसोबत रंगपंचमी साजरी
करत असताना
आमच्या स्वयंसेवका
अनुजा कदम



पुणे येथील मॅरेथॉन मध्ये
सहभागी माया केअरचे स्वयंसेवक,
बिंदू सहकारी, संस्थापक
व संचालक.



एक फेब्रुवारी रोजी पुण्यातील स्वयंसेवकांसोबत संस्थापकांची मिटिंग
झाली व त्या मीटिंगमध्ये स्वयंसेवकांना गौरवण्यात आले त्यावेळचा हा फोटो.



पुणे येथील लाभार्थ्यांना एमिकेन स्मार्ट स्टिक चे वाटप करत असताना.

आमच्या मुंबईच्या लाभार्थी
वंदना सोनवणे यांना प्रवासासाठी
जाण्यासाठी मदत करत असताना
स्वयंसेविका नंदा पंडित





पाठक वृद्धाश्रम सांगली येथील
ज्येष्ठ नागरिकांचे आरोग्य तपासणी
करत असताना आमच्या स्वयंसेविका
डॉक्टर धनश्री जठार

आधार वृद्धाश्रम आष्टा सांगली
येथील ज्येष्ठांसोबत रंगपंचमी
साजरी करत असताना
आमच्या स्वयंसेविका
स्नेहल कामू





आमच्या कोल्हापूरच्या लाभार्थी अरुणा जोशी यांना उपचारासाठी रुग्णालयात जाण्यासाठी मदत करत असताना आमचे स्वयंसेवक विश्वास पांचाळ




आत्मा फाउंडेशन पुणे येथील कार्यशाळेमध्ये सहभागी बिंदू सदस्य अर्चना जोशी व स्वयंसेवक विनिता महाजन



मातोश्री वृद्धाश्रम चंद्रपूर येथील ज्येष्ठ नागरिकांसोबत प्रजासत्ताक दिन साजरा करत असताना आमचे स्वयंसेवक आकाश गवारे



आमचे नाशिकचे लाभार्थी मुलाणी यांना मेडिकल मधून औषध आणून देत असताना आमचे स्वयंसेवक साहेबराव कांगुणे




जालना येथील जिल्हा बँकेतील ज्येष्ठ नागरिकांना चलन भरून देत असताना आमचे स्वयंसेवक कृष्णा दांडगे.



आमच्या यवतमाळच्या लाभार्थी पंचशीला कांबळे यांना बाजारातून किराणा सामान आणण्यासाठी मदत करत असताना आमच्या स्वयंसेविका दिव्या



आमचे मुंबईचे लाभार्थी लक्ष्मी गोविंदा कडेकर यांना प्रवासासाठी मदत करत असताना आमच्या स्वयंसेविका दिपाली जाधव



आमचे पुण्याचे लाभार्थी प्रकाश उन्हाळे यांना पत्ते खेळण्यासाठी मदत करत असताना आमचे स्वयंसेवक नंदू नारंग

**Maya CARE Foundation**

The next best thing to family

भावनिक/बौद्धिक /औपचारिक समर्थनासाठी वरिष्ठ नागरिकांना
मोफत 90 मिनीटांच्या भेटी

**✻ सेवा ✻**

त्यांना डॉक्टर / रेडियोथेरेपी / लसीकरण / सामाजिक कार्यक्रम
थिएटर / बँक / कागदपत्रे / लेखन / वाचन / खरेदी /
गॅझेटस वापरुन / व्हिडिओ कॉल करण्यात मदत

## MAYA CARE NATIONAL HELPLINE : 1800 572 1343

| CITY | FOR WHATSAPP |
|---|---|
| मुंबई,पुणे,कोल्हापूर,सांगली,सातारा,सोलापूर,लातूर, नागपूर,नाशिक,परभणी,अहमदनगर,छ.संभाजीनगर,जालना,जळगाव,धुळे,अमरावती,वर्धा,अकोला,बुलढाणा,यवतमाळ, चंद्रपूर,बीड,नंदुरबार,बेंगलोर,हैदराबाद,चेन्नई,दिल्ली,सुरत,वडोदरा,अहमदाबाद,गांधीनगर,कच्छ,चंदीगड,जालंधर,लुधियाना,अबोहर,जबलपूर,उज्जैन,भोपाळ,छतरपुर,ग्वाल्हेर ,इंदोर,रीवा,झांसी,लखनऊ,कानपूर,कोइंबतूर,पाँडिचेरी,पानिपत,गुवाहाटी,हहलखंडी,भुवनेश्वर,अंगूल,संबलपूर,जयपुर,जोधपुर,उदयपूर,ढोलपूर,जैसलमेर,बराण,कोची, तिरुअनंतपुरम,कोलकत्ता,पूर्व मिदनापूर,पश्चिम मिदनापूर,हावडा,बांकुरा,मालदा,उत्तर २४ परगणा,हरिद्वार,डेहराडून, इंग्लंड-लंडन, केंब्रिज, मिल्टन केन्स, मँचेस्टर. | 9552510400<br>9552510411<br>8055995966 |

**Website - www.mayacare.org | Email : service@mayacare.org**

तुम्ही जेष्ठ नागरिक आहात आणि तुम्ही एकटे किंवा दुकटे राहात आहात किंवा जेष्ठ नागरिक आहात आणि कुटुंबात राहात आहात पण अपंग आहात तर आम्ही आपल्याला संपूर्णपणे मोफत मदत करू शकतो:

१) किराणा , भाजी , फळफळावळ औषधे आणून देणे .
२) डॉक्टरकडे , घेऊन जाणे आपण रुग्णालयात दाखल असल्यास आय सी यु च्या बाहेर थांबणे .
३) आपल्याला धार्मिक किंवा इतर पुस्तके, वृत्तपत्रे वगैरे वाचून दाखविणे, लेखन करणे .
४) आपल्या बँकेत जाऊन पैसे काढणे ,पैसे भरणे, चेक भरणे .मुदत ठेव नुतनीकरण करणे
५) आपल्याला एसटी स्टँड , रेल्वे स्टेशन , विमानतळ येथे पोंहचविणे किंवा तेथून घरी सुखरूप पोहचविणे .
६) मोबाईल फोन वापरणे , कॉम्प्युटर वापरणे इत्यादी साठी मदत करू .
७) या शिवाय इतर अनेक गोष्टीसाठी आम्ही तुम्हाला मदत करू.
८) दिनानाथ मंगेशकर हॉस्पिटल पुणे, लायन ताराचंद बापा हॉस्पिटल मुंबई, जनरल हॉस्पिटल के आर पुरम बंगलोर, सरदार वल्लभ भाई पटेल हॉस्पिटल, नवी दिल्ली, सेंटर पॉईंट हॉस्पिटल नागपूर , के डि एम सी हॉस्पिटल मुंबई येथे विनामुल्य रुग्ण सेवा.

देणगीसाठी QR Code

**माया केअर कोणतीही नर्सिंग आणि तातडीची सेवा देत नाही.**

**✻ आपले अभिप्राय व सुचना यांचे स्वागत आहे. आपण ई-मेल करुन कळवू शकता.**

**देणगीसाठी आयकर सवलत आहे.**

**NAME OF THE A/C - MAYA CARE FOUNDATION**

**NAME OF THE BANK : ICICI BANK LIMITED** (BRANCH : TILAK ROAD,PUNE)
**ACCOUNT NO. : 187501000462**
**IFSC CODE : ICIC0001875**

**PRINTED MATTER**

बुक-पोस्ट

**FROM,**

**माया केअर फाऊंडेशन**
**1214 शुक्रवार पेठ, आफ्रिका हाऊस,**
**सुभाषनगर, गल्ली नं.04, पुणे - 411002.**

केवळ खाजगी वितरणासाठी / विनामूल्य

**TO,**

श्री/श्रीमती ____________________

Printed At - Sane & Shinde Associates
Tel.: 020-24477059